आपला
# सत्यवार्ता
अन्यायाविरुद्ध लढणारे एकमेव वृत्तपत्र

पनवेल • शुक्रवार दि. 8 मे 2026 ते 14 मे 2026 • वर्ष 3 रे • अंक 19 • पाने 4 • RNI : MAHMAR/2023/88879 | किंमत 3 रुपये

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क +91 86524 14343

# महिलांच्या न्यायासाठी उभारले नवे व्यासपीठ!

## महिलांना न्याय, सन्मान आणि स्वावलंबन देणारे कार्यालय सुरु

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

राजमाता प्रतिष्ठान व क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या महिला समूह कार्यालयाचे दिमाखदार उदघाटन पनवेल परिसरातील महिलांच्या हक्कांसाठी, न्यायासाठी आणि स्वावलंबनासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने कार्य करणाऱ्या महिला समूह कार्यालयाचे शानदार उद्घाटन उत्साहात पार पडले.

क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या संस्थापक सौ. रुपालीताई शिंदे सह राजमाता प्रतिष्ठानच्या अध्यक्ष सौ. रेश्मा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या उद्घाटन सोहळ्यास अनेक मान्यवर महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये विशाखा दुर्गे, विद्या काबळे, रंजना जाधव, जोशी मॅडम आणि सुनीता शिवले यांचा विशेष सहभाग होता. महिलांवरील अन्यायाविरोधात आवाज उठवणे, गरजू महिलांना मार्गदर्शन करणे तसेच त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी हे कार्यालय महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उद्घाटनावेळी महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे स्वागत केले. परिसरात महिलांसाठी सुरक्षित, सक्षम आणि न्याय मिळवून देणारे हे नवे व्यासपीठ ठरणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. महिलांच्या सन्मानासाठी आणि हक्कांसाठी सुरू झालेले हे कार्यालय भविष्यात अनेक महिलांना नवी दिशा देईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

**"महिलांच्या हक्कासाठी नवा आवाज!"**



# तरुणीच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

## मध्यरात्री दारूच्या नशेत हैदोस घालणाऱ्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात



### श्रद्धा कोकीळ यांचे धाडस

सोसायटीत सुरू असलेला हा राडा पाहून तेथील रहिवासी श्रद्धा कोकीळ या तरुणीने तात्काळ सतर्कता दाखवली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तिने न घाबरता तातडीने '१००' नंबरवर कॉल करून पोलिसांना या घटनेची माहिती दिली. श्रद्धाने दिलेल्या माहितीनंतर पोलिसांनी काही वेळातच घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या मद्यधुंद तरुणांना ताब्यात घेतले असून पुढील कारवाई सुरू आहे. एका जागृत तरुणीच्या धाडसामुळे आज एक मोठी अप्रिय घटना टळल्याची चर्चा परिसरात असून, श्रद्धा कोकीळ यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेलमधील सागर लक्ष्मी सोसायटीमध्ये काल रात्री बाराच्या सुमारास एका धाडसी तरुणीच्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली आहे. दारूच्या नशेत असलेल्या काही तरुणांनी सोसायटीत शिरून रहिवाशांच्या घरांचे दरवाजे वाजवून परिसरात घबराट निर्माण केली होती. मिळालेल्या माहितीनुसार, काल रात्री १२ वाजेच्या सुमारास २५ ते ३० वयोगटातील दोन ते तीन तरुण दारूच्या नशेत सागर लक्ष्मी सोसायटीच्या तळमजल्यावर शिरले. हे तरुण विनाकारण लोकांच्या घरांचे दरवाजे जोरात वाजवत होते आणि घरात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न करत होते. या अनपेक्षित प्रकारामुळे सोसायटीतील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते.

# सहा तासांत चोरीला गेलेला दीड कोटी रुपयाचा चोरीचा माल हस्तगत

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेल जवळील करंजाडे येथे सुरु असलेल्या रेल्वे पुलाच्या नवीन बांधणी संदर्भातील टाटा कंपनीचे ६७ टन स्टीलच्या पार्ट चोरी प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी तिघा जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून जवळपास दीड कोटी रुपयाचा चोरीचा माल हस्तगत आहे

ठिकाणी टाटा कंपनीचे रेल्वे पुल उभारण्याचे काम सुरु असून तेथील मॅनेजर बिजयकुमार वर्मा ( वय ४८ ) याने भंगारवाला आजीजूल अब्दुल रब रेहमान ( वय ४७ ) याच्याशी परवेज मोहम्मद अली आलव ( वय २९ ) याच्या मध्यस्थीने संपर्क साधून तेथील साईट वरील स्टीलचे पार्ट चोरण्यास मदत केली व जवळपास दीड कोटी रुपयाचा माल चोरून नेला होता . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच परिमंडळ - ३ चे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती शिंदे , पोहवा परेश म्हात्रे , संदेश म्हात्रे , अमोल पाटील , विनोद देशमुख आधीचे पथक तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या मदतीने शोध घेत असताना सदर माल चोरण्यासाठी जो हायड्रा वापरण्यात आला होता याची माहिती पोहवा परेश म्हात्रे यांना मिळाली त्यानुसार त्याला ताब्यात घेतले असता पुढील माहिती मिळून सदर माल हा धानसर येथे ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

# महावितरणच्या कार्यकारी संचालक अपर्णा गिते यांना पोलीस महासंचालक पदक



**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

महावितरणच्या कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्रीमती अपर्णा गिते यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल मानाच्या पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशामुळे महावितरणसह पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. श्रीमती अपर्णा गिते यांनी आपल्या पोलीस कारकिर्दीत अत्यंत कर्तव्यदक्ष, प्रामाणिक आणि शिस्तबद्ध अधिकारी म्हणून ओळख निर्माण केली आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच सार्वजनिक हितासाठी त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन त्यांना या पदकाने गौरवण्यात आले आहे. महावितरणमध्ये कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी) या पदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांनी वीज चोरी रोखणे, अंमलबजावणी व सुरक्षा यंत्रणेत समन्वय साधणे आणि विभागात शिस्तबद्ध कार्यक्षमता आणण्यासाठी प्रभावी पावले उचलली आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली अंमलबजावणी व सुरक्षा विभागाने विविध महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीपणे राबवल्या आहेत. श्रीमती गिते यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महावितरण प्रशासनाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# नेपाळमधील आशियाई सवात चॅम्पियनशिपमध्ये भारताचा डंका; विजयी खेळाडूंचा जंगी सत्कार



**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

नेपाळमधील काठमांडू युनिव्हर्सिटी, धुलीखेल येथे ३० एप्रिल ते ३ मे २०२६ या कालावधीत पार पडलेल्या '७ व्या आशियाई व इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप २०२६' मध्ये भारतीय खेळाडूंनी देदीप्यमान कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. या स्पर्धेत पदकांची लयलूट करणाऱ्या मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीच्या (MBMA) आणि महाराष्ट्राच्या सर्व विजयी खेळाडूंचा मंगळवार, ५ मे २०२६ रोजी पनवेलमध्ये भव्य सत्कार समारंभ व पत्रकार परिषद उत्साहात पार पडली.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून एकूण ७१ खेळाडूंनी सहभाग घेतला होता, त्यामध्ये महाराष्ट्रातील २४ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत २ सुवर्ण, ७ रौप्य आणि १५ कांस्य पदके जिंकली. विविध राज्यातील खेळाडूंच्या एकत्रित योगदानामुळे भारताने आशियाई स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी पटकावण्याचा बहुमान मिळवला. महाराष्ट्राच्या गार्गी कुलकर्णी आणि अंजली चव्हाण यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर आकांक्षा भालेकर, आर्या पवार, समृद्धी जुगदार, शिवम पाटील, श्रुतिका जाधव, वैष्णवी शिंदे आणि सार्थक महामुनी यांनी रौप्य पदके पटकावली. तसेच ऐश्वर्या नायक, अस्मि पाटील, वरद शेटे, मकरंद जुगदार, ध्रुव दिघाडे, अविर बनसोडे, प्रमोद ठोंबरे, आदित्य खंडीझोड, यश मोरे, ध्रुव कोलतेकर, ईश्वरी डेरे आणि स्वयम् शिंदे यांनी कांस्य पदक जिंकून देशाचे नाव उंचावले. 'हिमालयन इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप' मध्ये सिद्धी जोगदार, मंथन रोटे आणि आराध्या भोसले यांनी कांस्य पदकाची कमाई केली. पनवेल येथील खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात अकॅडमीच्या खेळाडूंचे टाळ्यांच्या कडकडाटात जल्लोषात स्वागत करण्यात आले. या यशानंतर खेळाडूंची भव्य विजय मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये स्थानिक नागरिक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सत्कार समारंभानंतर आयोजित पत्रकार परिषदेत प्रशिक्षक आणि खेळाडूंनी आपले अनुभव मांडले. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना आलेले दडपण आणि त्यावर मात करून मिळवलेले यश हा प्रवास अत्यंत कठीण पण प्रेरणादायी असल्याचे खेळाडूंनी सांगितले. या यशात खेळाडूंसोबतच प्रशिक्षक आणि पंचांचेही मोठे योगदान राहिले. राष्ट्रीय संघ प्रशिक्षक सुहास धाईंजे, आशिया पंच राहुल पवार आणि भूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हा विजय साकारला. तसेच भूपेंद्र शिवाजी गायकवाड, धनेशा शिंगोटे, राहुल पवार आणि सुशांत पोळ यांनी जज व रेफ्री म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली. आशियाई स्तरावरील या घवघवीत यशानंतर आता भारतीय खेळाडूंचे लक्ष्य सप्टेंबर २०२६ मध्ये फ्रान्स येथे होणाऱ्या 'सवात वर्ल्ड चॅम्पियनशिप' कडे लागले आहे. "आता आशियानंतर जग जिंकायचं" या निर्धाराने खेळाडू अधिक जिद्दीने सरावाला लागले आहेत. या यशामुळे केवळ पनवेल परिसराचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव क्रीडा विश्वात उंचावले असून विजयी खेळाडूंवर सर्वच स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# एनसीएमसी कार्डसाठी ज्येष्ठ नागरिकांची फरफट; भर उन्हात तासन्तास रांगा!

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेल एसटी स्टँड येथे वरिष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी कार्ड वाटप सुरू असताना मोठ्या प्रमाणात गैरसोयीचा प्रकार समोर आला आहे. गेल्या पाच दिवसांपासून ज्येष्ठ नागरिकांना भर उन्हात तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.
कार्ड बनवण्याची वेळ सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत ठेवण्यात आली असून कार्ड वाटपाची वेळ दुपारी २ ते सायंकाळी ५ :30 वाजेपर्यंत आहे. मात्र या प्रक्रियेमुळे ज्येष्ठ नागरिकांना दिवसभर हेलपाटे मारावे लागत असल्याची खंत व्यक्त होत आहे. कार्ड घेण्यासाठी येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी कोणत्याही प्रकारची मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याचा आरोप होत आहे.

*ना सावलीची व्यवस्था...*
*ना बसण्याची सोय...*
*ना पिण्याच्या पाण्याची सुविधा...*

अशा परिस्थितीत वयोवृद्ध नागरिकांना भर उन्हात तासन्तास उभे राहून त्रास सहन करावा लागत आहे. कार्ड बनवण्याचे काम एका खाजगी कंपनीला देण्यात आले असून प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाकडून तब्बल २०० रुपये आकारले जात आहेत. मात्र पैसे घेऊनही सुविधांचा अभाव असल्याने संताप व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे एखाद्या ज्येष्ठ नागरिकाची तब्येत बिघडल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.
डिजिटल ऑर्गनायझेशन ऑफ नेशन पक्षाचे महासचिव मा. संपत लगाडे यांनी याबाबत तीव्र खंत व्यक्त करत प्रशासनाने तातडीने ज्येष्ठ नागरिकांसाठी सावली, पाणी, बसण्याची व्यवस्था आणि स्वतंत्र सुविधा केंद्र व अधिक कर्मचारी उपलब्ध करून द्यावीत, असें माध्यमांशी बोलताना सांगितले. ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्याच्या घोषणा केल्या जातात... मात्र प्रत्यक्षात त्यांनाच भर उन्हात त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र पनवेलमध्ये पाहायला मिळत आहे.

**"सावली नाही... पाणी नाही... बसायची सोय नाही! २०० रुपये घेऊनही ज्येष्ठांची हेलपाटे"**



संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.



वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९° सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.



# निवडणुकीत जनता आठवली... आता चार महिन्यांतच लोकप्रतिनिधी गायब!”

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीदरम्यान जनतेच्या सेवेसाठी रात्रंदिवस झटत असल्याचा आव आणणारे अनेक समाजसेवक, समाजसेविका, आजी-माजी नगरसेवक आणि नव्याने निवडून आलेले पदाधिकारी आता अवघ्या चार महिन्यांतच गायब झाल्याचे चित्र शहरात पाहायला मिळत आहे. निवडणुकीपूर्वी प्रत्येक गल्लीबोळात फिरत “आपला हक्काचा माणूस” म्हणवून घेणारे अनेक चेहरे आता फक्त उद्घाटन कार्यक्रम, नारळ फोडणे, फोटोसेशन आणि निवेदन स्वीकारणे यापुरतेच मर्यादित राहिल्याची संतप्त भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

शहरातील विविध प्रश्नांवर नागरिकांकडून सातत्याने निवेदने, पत्रे आणि तक्रारी दिल्या जात आहेत. मात्र त्या पत्रांची साधी दाखलही घेतली जात नसल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी प्रश्न जसेच्या तसे कायम असून त्यावर कोणताही ठोस निर्णय, पाठपुरावा किंवा काम पूर्णत्वास नेण्याची इच्छाशक्ती दिसत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.



महिलांवरील वाढते अत्याचार, फसवणूक, बेकायदेशीर धंदे, वाढती गुन्हेगारी, रस्त्यांच्या समस्या, अतिक्रमण, पाणी प्रश्न यांसारख्या गंभीर विषयांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींची भूमिका केवळ “पत्र घ्या आणि शांत बसा” इतपतच राहिली आहे का? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. पनवेलमध्ये अनेक ठिकाणी नागरिक समस्यांनी त्रस्त असताना काही पदाधिकारी केवळ सोशल मीडिया पोस्ट, उद्घाटन समारंभ आणि स्टेजपुरत्या राजकारणात व्यस्त असल्याचे चित्र आहे.

निवडणुकीवेळी दिलेली आश्वासने, मोठमोठ्या घोषणा आणि “जनतेसाठी सदैव उपलब्ध” राहण्याचे दावे आता हवेत विरल्याची चर्चा सर्वसामान्यांमध्ये सुरू आहे. दरम्यान, प्रामाणिकपणे प्रश्न मांडणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनाच दबाव, दुर्लक्ष आणि राजकीय अडथळ्यांना सामोरे जावे लागत असल्याचेही बोलले जात आहे.




**■ पनवेलमध्ये ‘नारळ फोडा आणि पत्र घ्या’ राजकारणाचा बोलबाला; जनतेच्या प्रश्नांकडे मात्र पाठफिरवणूक निवडणुकीपूर्वी घराघरात फिरणारे लोकप्रतिनिधी आता दिसेनासे; नागरिकांमध्ये तीव्र नाराजी.**

**“जनतेने मत दिले कामासाठी... केवळ उद्घाटनासाठी नाही!”**

■ पनवेलकर आता स्पष्टपणे म्हणू लागले आहेत फक्त नारळ फोडून फोटो काढण्यापेक्षा प्रश्न सोडवा, निर्णय घ्या आणि काम पूर्ण करा; अन्यथा जनता पुढच्या वेळी उत्तर द्यायलाही तयार आहे!



## महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे भव्य हळदीकुंकू कार्यक्रम व व्याख्यान संपन्न

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिन, कामगार दिन तसेच हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सुकापूर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे भव्य दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये हळदीकुंकू समारंभासोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपनेते बाळ माने, सहसंपर्क प्रमुख अनिल चव्हाण व विधानसभा संघटक दीपक निकम यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर चैतन्य महाराज बुरुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमावर व विचारांवर सुमारे एक तास प्रभावी व्याख्यान दिले. या व्याख्यानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यानंतर महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास विविध महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभली. तसेच शिवसेना सुकापूरचे विभाग प्रमुख धनंजय पाटील, विशाल भोईर, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शाखा प्रमुख हनुमंत खंडागळे, महिला आघाडी भारती गोसावी तसेच शिवसेना प्रणीत डॉ. सेल महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ. आशिष बांदेकर यांनी कार्यक्रमास उपस्थित राहून सहभाग नोंदवला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

## थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत साहेबांनी आपले संपूर्ण आयुष्य 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या तत्त्वासाठी वेचले. त्यांच्या अथांग कार्यामुळेच आपल्या परिसराला नावलौकिक प्राप्त झाला आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी शेलघर येथे केले. स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

थोर समाजसुधारक स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवारी स्वर्गीय जनार्दन भगत यांच्या शेलघर येथील निवासस्थानी भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, शकुंतला ठाकूर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी भगत साहेबांच्या पवीत्र स्मृतीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

जनार्दन भगत यांनी शिक्षण आणि न्यायदानाचे महत्त्वपूर्ण कार्य करून सर्वसामान्य माणसाला आधार दिला. गावांमधील तंटे सोडवताना कोणावरही अन्याय होणार नाही याची त्यांनी नेहमीच सामाजिक भूमिकेतून काळजी घेतली, अशा शब्दांत मान्यवरांनी त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला. या अभिवादन सोहळ्यासाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, संजय भगत, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, माजी सदस्य भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, वसंतशेठ पाटील, अरुणशेठ ठाकूर, जयवंत देशमुख, जितेंद्र म्हात्रे, विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच सचिन घरत, अशोक कडू यांच्यासह स्वप्निल ठाकूर, कृपेश कांडपिळे, प्रकाश भगत, अजय भगत आणि इतर अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कळंबोली छापेमारीत सव्वा लाखाचा गुटखा साठा जप्त

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

**कळंबोली :** कळंबोली पोलिसांनी एका घरावर छापा मारून जवळपास सव्वा लाखाचा गुटखा साठा जप्त केला आहे .

कळंबोलीतील दत्त अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन मधील घरावर छापा मारुन सदर घरामध्ये साठवून ठेवलेला १ लाख १२ हजार ५०० रुपयांचा प्रतिबंधित तंबाखू आणि गुटखा पोलिसांनी हस्तगत केला आहे. यावेळी सदर गुटख्याचा साठा करुन ठेवणारा आरोपी पळून गेला असून कळंबोली पोलिसांनी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे. कळंबोलीतील दत्त अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन मधील बिल्डींग नंबर-१६ मधील रुम नंबर ४ मध्ये गुटख्याचा साठा लपून ठेवण्यात आल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने छापा टाकला. मात्र, छापा टाकण्यापूर्वीच गुटख्याचा साठा करुन ठेवणारा आरोपी गोलू राजपूत याने पलायन केले.

# पनवेलमध्ये उभारणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्य ॲक्वेरियम केंद्र : आमदार विक्रांत पाटील यांची मागणी

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेल सारख्या भौगोलिक महत्त्व असलेल्या व झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरात एखादा मोठा पर्यटन दृष्टीने महत्वाचा प्रकल्प असणे आवश्यक आहे या दूरदृष्टीने मा. आमदार विक्रांत पाटील यांनी अर्थसंकल्प अधिवेशन 2026 मागणी केली होती. याविषयावर मंत्री नितेश राणे यांनी प्रस्तावाचे कौतुक करत याविषयाची तातडीने बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते.

आज याविषयाची महत्त्वपूर्ण बैठक मंत्री मत्स्यव्यवसाय श्री. नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्या सोबत आयोजित करण्यात आली होती. या बैठकी दरम्यान आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेलचे भौगोलिक महत्त्व व या आंतराष्ट्रीय दर्जाच्या ॲक्वेरियमची आवश्यकता हे विषय विस्तृतपणे माहिती देऊन पटवून दिले. विशेषतः जवळच साकारलेले नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नव्याने होत असलेली तिसरी मुंबई तसेच नैना प्रकल्प यामुळे यासंपूर्ण भागात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे असा ॲक्वेरियमचा प्रकल्प आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यटनाला चालना देणारा ठरेल. तसेच या प्रकल्पामुळे पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचा अभ्यास, शैक्षणिक संशोधन




आणि स्थानिक रोजगार निर्मितीला मोठी चालना मिळेल, याचे महत्व आमदार विक्रांत पाटील यांनी पटवून दिले. या प्रकल्पासाठी लागणारी जागा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ यांच्या माध्यमातून पनवेल येथील मत्स्य उपकेंद्राच्या ठिकाणी उपलब्ध करून दिली जाणार असून हि जागा गोडे पाणी व खारे पाणी याची उपलब्धता असणारी आहे. तसेच प्रकल्पाच्या पुढील विकासासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभाग पुढील आवश्यक ती कार्यवाही करणार असल्याचे बैठकीत ठरले आहे. या प्रकल्पामध्ये सागरी तसेच गोड्या पाण्यातील विविध जीवसृष्टीचे प्रदर्शन, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्वेरियम, तसेच पर्यटकांना आकर्षित करणारे “सी लायन शो” यांसारख्या उपक्रमांचा समावेश असणार आहे. हा प्रकल्प आंतराष्ट्रीय दर्जाचा असणे आवश्यक असून त्यासाठी आवश्यक ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार नियुक्त केले जातील असे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले. या बैठकीस आयुक्त मत्स्य विभाग- श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, पनवेल मनपा आयुक्त मंगेश चितळे, कोंकण कृषी विद्यापीठ दापोली चे अधिकारी, इतर तज्ज्ञ आणि जिल्हाधिकारी कार्यालय रायगड चे अधिकारी उपस्थित होते. पनवेलच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असल्याचा विश्वास मा. आमदार विक्रांत पाटील यांनी व्यक्त केला.a

# पनवेल शहरातील विश्राळी तलावाच्या समोरील भूखंडावरील अनधिकृत बांधकामे महापालिकेमार्फत निष्कासित

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी



पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती-ड अंतर्गत विश्राळी तलावाच्या समोरील बाजूस अंतिम भूखंड क्रमांक २१७ वर अनधिकृत बांधकाम करण्यात आले होते अनेक वर्षे याठिकाणी अनधिकृत बांधकाम करून अनेक लोक वास्तव्यास होते त्यांनी एकमजली दुमजली घरे देखील पक्के बांधकाम करून बांधली होती. सदरचे बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३-१ अन्वये पनवेल महापालिकेने वारंवार नोटीस देवून याठिकाणी असलेले अनधिकृत बांधकाम दिलेल्या नोटिसीच्या मुदतीत काढून टाकण्याबाबत अनेकदा कळविण्यात आले होते.

परंतु सदरचे बांधकाम संबंधितांनी निष्कासित केलेले नाही. अंतिम भूखंड क्र - २१७ या भूखंडावरील अनधिकृत बांधकामाबाबत मुंबई उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका २११/२०२३ दाखल करण्यात आली होती. सदर भूखंडावर केलेल्या बांधकामाकरीता पनवेल महानगरपालिकेची (पूर्वीच्या पनवेल नगरपरिषदेची) घेतलेली बांधकाम परवानगी, मंजूर नकाशाची व मालकी हक्काचे दस्तऐवज यांच्या छायांकित प्रती ७ दिवसांच्या आत सादर करण्यास तेथील भूखंडावर राहणाऱ्या नागरिकांना सांगितले होते मात्र तशी कोणतीही कागदपत्रे सादर करण्यात न आल्याने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील उपरोक्त संदर्भिय आदेशा नुसार सुनावणी घेवून सुनावणी दरम्यान उपलब्ध कागदपत्रे व आपले युक्तीवाद / म्हणणे तसेच या कार्यालयाकडील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता अं.भू.क्र -२१७ च्या बांधकामाकरिता कोणतीही परवानगी न घेतल्याचे निदर्शनास आल्याने संदर्भ क्र- ४ अन्वये आदेश पारित करून अं.भू.क्र.२१७ वरील बांधकाम हे अनधिकृत असल्याचे घोषित करून बांधकाम निष्कासित करण्याचे आदेशही दिले त्यानुसार आज पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक आयुक्त रुपाली माने व प्रभारी प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे यांनी सदर भूखंडावरील अनधिकृत बांधकाम निष्कासित केले.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी, पोलीस प्रशासन व सुरक्षा रक्षक आदी उपस्थित होते. दरम्यान या कारवाईमुळे बाजूला विश्राळी तलावाच्या लागून असलेल्या अंतिम भूखंड २०९ वरील तलावामध्ये केलेल्या बेकायदेशीर बांधकामांना पण नोटीस देण्यात आल्या असून लवकरच या बांधकामांवर देखील महापालिकेतर्फे कारवाई करण्यात येणार आहे.



## प्रामाणिकपणाचा आदर्श; वाल्मिकी समाजातील अन्नु पारचे यांचा गौरव

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी

प्रभाग क्र. १८ मधील वाल्मिकी नगर येथे राहणाऱ्या व वाल्मिकी समाजातील श्रीमती अन्नु अशोक पारचे यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाऊसकीपिंगचे काम करत असताना त्यांना रोख रक्कम व सुमारे २ लाख रुपयांचा चेक सापडला. कोणताही मोह न बाळगता त्यांनी तो चेक तात्काळ आपल्या वरिष्ठांकडे सुपूर्द केला. त्यांच्या या प्रामाणिक, कर्तव्यनिष्ठ व मूल्याधिष्ठित वर्तनाची दखल घेत संबंधित संस्थेकडून त्यांना सुपरवायझर पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याबद्दल पनवेल महापालिकेचे महापौर सन्माननीय श्री. नितीन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सोबत नगरसेवक श्री. दशरथ म्हात्रे हेही होते. अन्नु पारचे यांच्या या कृतीमुळे वाल्मिकी समाजाची प्रामाणिकपणा, कष्टाळूपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणारी परंपरा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## गुंडगिरीचा कळस! पनवेलमध्ये तरुणावर बेदम मारहाण ; बेडागँगचा कहर उघड!

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी

पनवेल तालुक्यातील देवद परिसरात गुंडगिरीचा थरारक प्रकार समोर आला आहे. विचुंबे गावातील बेडागँगने 17 वर्षीय तरुणाला अपहरणासारख्या पद्धतीने निर्जन ठिकाणी नेऊन अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना उघड झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार,(दैवत येथील पीडित तरुणाला आरोपी संदेश पाटील याने "काम आहे" असे सांगून स्कुटीवर बसवून शिवकर परिसरातील डुकर पोल्ट्री फार्मच्या मागे नेले.

तेथे आधीच दबा धरून बसलेल्या गँगमधील गुड्डू भोईर, आदित्य सुरते आणि इतर 4-5 जणांनी एकत्र येत "तू वायर चोरी केली आहेस" असा खोटा आरोप करत प्लास्टिक पाइप, गॅस पाइपने बेदम मारहाण केली इतकेच नव्हे तर, पीडिताच्या पायाला दोरी बांधून फरफटत नेल्याचा संतापजनक प्रकारही समोर




आला आहे! डोक्यावर, हातावर आणि पायांवर गंभीर दुखापती करण्यात आल्या

ही गुंडांची टोळी एवढ्यावरच थांबली नाही, तर मारहाणीनंतर पीडिताला धमकी देत "घरी सांगितले तर संपवू" अशी उघड धमकी दिली! या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला असून तपास अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक राजरत्न खैमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रश्न मोठा आहे — पनवेलमध्ये गँगचा इतका बिनधास्त धिंगाणा कसा? अल्पवयीन मुलावर अशी निर्दयी मारहाण... कायदा कुठे आहे? या गुंडांना कडक शिक्षा कधी होणार? परिसरात वाढती गुंडगिरी रोखणार तरी कोण?असा संताप जनक सवाल पीडित व पीडिताची आई करत आहे..

## खून आणि चोरी तसेच फिर्यादीला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपी संदीप गुप्ता हयास जन्मठेप

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी

दिनांक ०७/०५/२०२६ रोजी मा. उगले साहेब सत्र न्यायालय पनवेल हयांनी इ.पि. को. कलम ३०२,३०७,३९४,३९७ अन्वये आरोपी संदीप गुप्ता रा. उल्वे हयास जन्मठेप व ५०,००० रूपये दंडाची शिक्षा ठोकावली. गुन्हयाची हकीकत राम प्रसाद गुप्ता आणि त्यांची पत्नी लक्ष्मी देवी, उलवे येथील फलॅटवर दोघेच राहात होते. त्यांची तिन्ही मुले व एक मुलगी इतरत्र राहत होते. संदीप गुप्ता हा मयत रामप्रसाद हयांचा मुलगा सतीश हयाचा मेव्हणा आहे. त्यांने रामप्रसाद यांच्याकडून ७०,००० रू. उसने घेतले होते. सदरची रक्कम रामप्रसाद हे आरोपी संदीप कडे मागत होते. त्या रागातून चोरीच्या व खूनाच्या इरादयाने दिनांक २२/०४/२०२६ रोजी आरोपी संदीप हा रामप्रसाद यांच्या घरी आला. घरी रामप्रसाद व पत्नी दोघेच होते.

लक्ष्मीदेवी घरात चहा बनवण्यासाठी गेले असता आरोपी संदीप हयांने रामप्रसाद हयास बेडरूममधे नेऊन चाकूने वार करून खून केला. पत्नी बेडरूममधे पाहण्यासाठी गेली असता आरोपीने तीच्याही गळ्यावर वार करून तिला बाथरूमधे आपटली त्यानंतर कपाटातून नऊ तोळे दागिने व ८०,००० रूपये चोरून आरोपीने पोबारा केला. जखमी लक्ष्मीदेवी कशीबशी इमारती खाली येऊन तिने एका साक्षीदारा सामक्ष इंग्रजी पेपरवर 'सतीश के साले ने मेरे पती को मारा' असे लिहून ठेवले त्यानंतर तिला दवाखान्यात उपचारासाठी नेले दोन साक्षीदारांचा सतर्कतेने तिला ताबडतोब उपचार मिळाले व तिचे प्राण वाचले. तिची साक्ष हया खटल्यात महत्वाची ठरली. सदर गंभीर गुन्हा एन.आर.आय पोलीस ठाण्यात दाखल होउन पुढील तपास पोलीस उपाध्यक्ष स्मिता जाधव यांनी केला होता.

पनवेल सेशन कोर्टात सरकारी वकील वाय. एस. भोपी यांनी हा खटला लढवला. सुनावणी दोन वर्ष चालली. १६ साक्षीदार तपासण्यात आले. सरकारी वकीलांचा जोरदार युक्तीवाद मान्य करून कोर्टाने आरोपीस ई.पी. को कलम ३०२, ३०७, ३९४, ३९७ खाली जन्मठेप व दोन वेळा ७-७ वर्ष सश्रम कारावास व ५०,००० रूपये दंड अशी शिक्षा ठोठावली. दंडाची रक्कम व दागिने, रूपये ८०,००० फिर्यादी लक्ष्मीदेवी हिला देण्याचेही आदेश केले.

सदर केसचे कामी पोलीस वाघचौरे, पोलीस गिरासे व आताच्या डी. वाय. एस.पी. स्मिता जाधव व साक्षीदारांचे मोलाचे सहाय्य लाभले. निराधार व वृध्द इसमांच्या अगतीकपणाचा व एकटेपणाचा गैरफायदा घऊन खून व चोरी करणा-या प्रवृत्तीला जन्मठेप मिळाल्याने मिळाल्याने सर्व स्तरांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## नवी मुंबई मध्ये ग्लोबल बिझनेस समिटचे आयोजन; यू बिझनेस मिट यांचा अनोखा उपक्रम

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी

नवी मुंबई मधील प्रथमच ग्लोबल बिझनेस समिट चे आयोजन करण्यात आले आहे. भारत आणि थायलंड यांच्यामधील व्यापार वृद्धीच्या अनुषंगाने हे समिट अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बेलापूर येथील पार्क या तारांकित हॉटेल मध्ये १८ मे रोजी ही समिट संपन्न होणार आहे.

थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच इ कॉर्न दब्बरान्सी, इंजीनियरिंग इन्स्टिट्यूट ऑफ थायलंडचे संचालक तथा PEITA चे सल्लागार प्रो. डॉ. चियांचुंग ओदि कलायांनामित्र, भारतातील थाई दुधावासाचे माजी सदस्य तथा PEITA चे सल्लागार थाराडोल थाँग्रंग, पंतप्रधान कार्यालयातील फॉरेन अफेयर्स सचिव प्रसर्त पियासाचादेश यांचे शिष्टमंडळ या बिझनेस सबमिटमध्ये थायलंड देशाच्या वतीने उपस्थित राहणार आहे. तूर्तास युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांतील व्यापार वृद्धी हा विषय संपुष्टात आलेला आहे. होर्मुज समुद्रधुनी रोखून ठेवल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर त्याचे अत्यंत विपरीत परिणाम दिसून येत आहेत. युनायटेड नेशन्स सोबत महत्त्वपूर्ण बिजनेस ट्रेड डील झालेली असली तरी देखील ती अमलात आणण्यासाठी किती वेळ लागेल याचे कुणाकडे शाश्वत उत्तर नाही. व्यवसायाच्या दृष्टीने महासत्ता असणाऱ्या अमेरिकेला सध्या युद्धाची झळ सोसावी लागत असल्या कारणामुळे भारतीय गुंतवणूकदार व्यवसाय वृद्धी करता या देशाकडे देखील सकारात्मक दृष्टीने पाहत नाहीत.

चीन सारखा व्यवसाय वातावरण पोषक देश आपल्या शेजारी असून देखील या देशासोबत असणारी विश्वासार्हता ही नेहमीच वादातीत राहिलेली आहे. याच कारणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये व्यवसाय वृद्धी करण्याकरता भारतातील लघु मध्यम आणि मोठे व्यावसायिक योग्य संधीच्या शोधात आहेत. दुसरीकडे थायलंड सारखा देश हा सातत्याने ऐयाशी करण्याकरता



प्रसिद्ध राहिलेला आहे. परंतु या देशातील असणाऱ्या व्यवसाय पोषक परिस्थितीचा भारतातील गुंतवणूकदार आणि व्यावसायिक यांना फायदा होऊ शकतो. याच गोष्टीची चाचपणी करण्याकरता दोन्ही देशांतील व्यावसायिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करण्याकरता यु बिझनेस मीट यांच्यावतीने ग्लोबल समिट २०२६ चे आयोजन करण्यात आलेले आहे. १८ मे रोजी संपूर्ण दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी व्यवसायाचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी स्टॉलचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या समितीमध्ये सहभागी होण्याकरता सशुल्क नावे नोंदणी प्रक्रिया सुरू झालेली असून बुक माय शो च्या माध्यमातून देखील या समितीमध्ये रजिस्ट्रेशन करता येऊ शकेल. रियल इस्टेट, इम्पोर्ट एक्सपोर्ट, बँकिंग, एज्युकेशन, टेक्नॉलॉजी, मेडिकल टुरिझम, लाईफस्टाईल आणि हेल्थकेअर, स्पेशल टुरिझम, स्पिरिचुअल टुरिझम ग्लोबल मीडिया अँड एंटरटेनमेंट या व्यवसाय क्षेत्रांवर प्राधान्य क्रमाने फोकस ठेवण्यात आलेला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर द्विदेशीय व्यवसाय संधी शोधण्याच्या प्रयत्नात यु बिझनेस मीट यांनी थायलंड या देशापासून सुरुवात केलेली असून नजीकच्या भविष्यात अशाच पद्धतीच्या व्यवसाय सुलभ पोषक वातावरण असणाऱ्या देशांसोबत बिझनेस समिट आयोजित करण्याचे मानस आहे.

## कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीच्या कॉपर पाइपची चोरी

पनवेल प्रतिनिधी

कळंबोली परिसरात चोरीच्या घटनांनी पुन्हा डोके वर काढले असून, चोरट्यांनी आता शैक्षणिक संस्थांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. कळंबोली येथील 'दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट'मधील एसीचे कॉपर पाईप अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास कापून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सेक्टर-५ई, केएल-१ परिसरातील इन्स्टिट्यूटच्या बाहेर बसविण्यात आलेल्या एसी युनिटमधील महागडे तांब्याचे पाईप चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत चोरी केले. सकाळी इन्स्टिट्यूट चालकाने हा प्रकार लक्षात घेतला. या घटनेमुळे संस्थेला आर्थिक फटका बसला असून, एसी बंद पडल्याने विद्यार्थ्यांच्या अभ्यासातही अडथळे निर्माण झाले आहेत. दरम्यान, कळंबोली परिसरात गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वीच एका हळदी समारंभात महिलेचे सुमारे १८ तोळे दागिने हिसकावण्याचा प्रयत्न झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर आता एसी पाईप चोरीच्या घटनेमुळे व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तांब्याच्या वाढत्या किमतीमुळे अशा प्रकारच्या चोरींना चालना मिळत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिक व व्यावसायिकांनी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांवर लगाम लावावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

## ग्रामीण भागात मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या डॉक्टरांची धाडसी कामगिरी

आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी

ग्रामीण भागात अत्यावश्यक सुविधा नसतानाही नवी मुंबईतील खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्समधील डॉक्टरांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे एका ३५ वर्षीय क्षयरोग (TB) रुग्णाचा जीव वाचविण्यात यश आले आहे. हृदयाभोवती मोठ्या प्रमाणात द्रव साचल्याने (पेरिकार्डियल इफ्युजन) गंभीर स्थितीत असलेल्या या रुग्णावर डायलिसिस कॅथेटरचा वापर करून यशस्वी उपचार करण्यात आले.

रोहा तालुक्यातील आदिवासी पाड्यातील हा रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत ओपीडीमध्ये दाखल झाला. तपासणीत 'पेरिकार्डियल इफ्युजन' (हृदयाभोवती द्रव साचणे) आणि 'कार्डियाक टॅम्पोनाड' (हृदयावर दबाव येणे) असल्याचे स्पष्ट झाले. या स्थितीत तातडीने द्रव काढणे आवश्यक होते, अन्यथा रुग्णाचा मृत्यू होऊ शकत होता. रुग्ण श्री मनोहर पवार हे क्षयरोगाशी संबंधित गुंतागुंतींमुळे अत्यंत अशक्त झाले होते. त्यांना श्वास घेण्यास तीव्र त्रास होत होता, रक्तदाब कमी झाला आणि ऑक्सिजनचे प्रमाण कमी होते. रोहा परिसरात ७०–८० किमी अंतरावरही कार्डियाक सेंटर किंवा कॅथलॅब उपलब्ध नसल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली होती. सुरुवातीला रुग्णाला संवेदन नर्सिंग होम येथे दाखल करण्यात आले, जिथे रोहा येथी डॉ. मनीष वैरागी (मधुमेह तज्ज्ञ व जनरल फिजिशियन) यांनी तातडीने उपचारास सुरुवात केली त्यानंतर काही दिवसांनी रुग्णाला मेडिकव्हरच्या आउटरीच ओपीडीत जाण्याचा सल्ला दिला. तिथे डॉ. अनुप महाजनी (कार्डिओलॉजिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर) यांनी तातडीने २डी इकोकार्डिओग्राफी करून हृदयाभोवती जवळपास १.५ ते २ लिटर द्रव साचल्याचे निदान केले. साधारणपणे ही प्रक्रिया कॅथलॅबमध्ये विशेष उपकरणांसह केली जाते.

मात्र, त्या ठिकाणी अशी कोणतीही सुविधा नसताना डॉ. महाजनी यांनी डायलिसिस कॅथेटरचा वापर करून 'पेरिकार्डिओसेंटेसिस' ही प्रक्रिया केली. अल्ट्रासाऊंडच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काळजीपूर्वक १.५ लिटर द्रव यशस्वीपणे बाहेर काढला. या प्रक्रियेनंतर रुग्णाचा रक्तदाब १००/७० mmHg पर्यंत सुधारला, श्वासोच्छ्वास सुरळीत झाला आणि तो शुद्धीवर आला. ही परिस्थिती हाताळणे अतिशय आव्हानात्मक होती. आवश्यक उपकरणे नसतानाही योग्य निर्णय घेऊन प्रसंगावधान राखत डॉक्टरांनी रुग्णाचा जीव वाचवला,असे डॉ. अनुप महाजनी यांनी स्पष्ट केले. रोहा येथील संवेदन नर्सिंग होममधील मधुमेह तज्ञ आणि फिजिशियन डॉ. मनीष के. वैरागी म्हणाले, या रुग्णाचा वैद्यकीय प्रवास अतिशय गुंतागुंतीचा आणि आव्हानात्मक होता.

सुरुवातीला त्यांना आमच्या रुग्णालयात अत्यंत गंभीर अवस्थेत दाखल करण्यात आले होते, तेव्हा त्यांचा रक्तदाब मोजता येत नव्हता आणि ऑक्सिजन सॅचुरेशन कमी झाले होते. सखोल तपासणी केल्यानंतर आमच्या लक्षात आले की, त्यांना क्रॉनिक पॅनक्रियाटायटिसचा (दीर्घकालीन स्वादुपिंडाचा दाह) त्रास होता, ज्यासोबत वारंवार होणारा प्लुरल इफ्युजन (फुफ्फुसाच्या आवरणातील द्रव साचणे) आणि गंभीर पेरिकार्डियल इफ्युजन (हृदयाभोवतीच्या आवरणातील द्रव साचणे) यांसारख्या गुंतागुंती होत्या, तसेच सेप्टिसेमिक शॉक (रक्तविषारामुळे आलेला धक्का) देखील होता.

# डंपरच्या धडकेत वकिलाचा मृत्यू; खारघरमध्ये रास्तारोको

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

खारघर उपनगरात भरधाव डंपरने दुचाकीस्वार तरुण वकिलाला चाकाखाली चिरडल्याची धक्कादायक घटना सोमवारी सायंकाळी घडली. या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी तातडीने रास्तारोको करत आरोपीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. काही तासांच्या आंदोलनानंतर पोलिसांनी जमावाची समजूत काढत वाहतूक सुरळीत केली.

सीबीडी बेलापूरकडून सेंट्रल पार्कच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर हा अपघात झाला. २८ वर्षीय महेश अशोक लोहार असे मृत वकिलाचे नाव असून ते खारघरच्या सेक्टर १२ परिसरात राहत होते. सोमवारी सायंकाळी ते आपल्या मित्रासोबत दुचाकीवरून घरी जात असताना राडारोडा वाहून नेणाऱ्या भरधाव डंपरने त्यांना डंपरच्या मागील चाकाखाली चिरडले. या भीषण अपघातात महेश यांच्या अंगावरून डंपर गेल्याने ते जागीच ठार झाले तर डंपरच्या धडकेत त्यांचा मित्र उडवला गेला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि मृताच्या नातेवाईक आणि मित्रमंडळींनी घटनास्थळी गर्दी करत तीव्र संताप व्यक्त केला. काही वेळातच त्यांनी रस्त्यावर ठिय्या देत रास्तारोको सुरू केला. यामुळे खारघरमधील उत्सव चौक ते अग्निशमन दलापर्यंत वाहतूक ठप्प झाली आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्यासह वाहतूक शाखेचे अधिकारी व पोलीस दाखल झाले. त्यांनी संतप्त जमावाची समजूत काढत योग्य कारवाईचे आश्वासन दिले. अखेर सायंकाळी साडेसातच्या सुमारास आंदोलन मागे घेण्यात आले आणि वाहतूक पुन्हा सुरू झाली.

दरम्यान, सोमवारी रात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खारघरमध्ये याच मार्गावरून एका विवाह सोहळ्यासाठी येणार असल्याने मुख्यमंत्र्यांच्या ताफ्याला वाहतुक कोंडी आणि अनुचित प्रकाराला सामोरे जावे लागू नये म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी या घटनेनंतर डंपरचालकाला ताब्यात घेतल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जोशी यांनी दिली. यापूर्वीही खारघर उपनगरात अशाच पद्धतीने एका जेष्ठ नागरिकाला अनोळखी वाहनाने उडवून त्यांना जखमी केले. या अपघातामध्ये जेष्ठ नागरिकाचा मृत्यू झाला. अजूनही ते अनोळखी वाहन पोलीस शोधू शकले नाहीत. स्मार्टसीटीतील रस्ते चकाचक असल्याने भरधाव वेगाने धावणा-या वाहनांच्या गतिवर नियंत्रणासाठी स्मार्टयंत्रणा अजून विकसित करण्यात सरकारी यंत्रणा असफल ठरली आहे.



# पनवेलमध्ये उद्योगाभिमुख कौशल्यविकासासाठी भागीदारी

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सहाय्याने कार्यरत सामाजिक विकास संस्था ईशान्य फाउंडेशनने महाराष्ट्रातील पनवेल येथील भोकरपाडा येथे प्रगत कौशल्य विकासासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्यासाठी नामटेक (NAMTECH) सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. नामटेक ही आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी स्थापन केलेल्या सेक्शन ८ कंपनीचा एकभाग असून, सध्या ती गुजरातमधील गांधीनगर येथे कौशल्य विद्यापीठ उभारण्याचेकामकरतआहे.'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा हा प्रकल्प दीपक फर्टिलायझर्सच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांचा भाग असून, रोजगारक्षमता वाढवणे आणि उद्योगसिद्ध मनुष्यबळ तयार करण्यासाठी भविष्याभिमुख कौशल्य विकास परिसंस्था उभारणे हा यामागील उद्देश आहे.

हा उपक्रम दीपक फर्टिलायझर्स चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर एस. सी. मेहता, तसेच ईशान्य फाउंडेशन मॅनेजिंग ट्रस्टी पारुल मेहता यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व मार्गदर्शनातून साकार झाला आहे. शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.या तीन वर्षांच्या सहकार्याअंतर्गत, नामटेक (NAMTECH) ईशान्य फाउंडेशनला "सेंटर ऑफ एक्सलन्स" स्थापन व कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक सल्ला आणि अंमलबजावणीसाठी मदत करणार आहे. या उपक्रमाद्वारे बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच उद्योगात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी कौशल्यवृद्धी आणि पुनःकौशल्यविकास कार्यक्रमदेखील राबविण्यात येणार आहेत.पनवेलमधील भोकरपाडा येथे जुन्या मुंबई–पुणे महामार्गालगत दोन एकर जागेवर हे उत्कृष्टता केंद्र विकसित करण्यात येणार आहे. उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील बदलत्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य दरी कमी करणे, उत्पादकता वाढविणे आणि रोजगार क्षमतेत सुधारणा घडविणे हा या संस्थेचा उद्देश असेल.

या उत्कृष्टता केंद्रामध्ये उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील प्राधान्यक्षेत्रे व रोजगार भूमिका निश्चित करण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांची मागणी आणि उद्योगाच्या गरजेनुसार प्रवेश क्षमतेचे नियोजन केले जाईल. आधुनिक वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कार्यशाळा, नवोपक्रम केंद्रे, प्रशासकीय सुविधा, वसतिगृह, कॅफेटेरिया आणि आवश्यक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असतील. हा प्रकल्प अंदाजे ३५ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन असून, बांधकाम व टप्प्याटप्प्याने विकास नामटेकच्या तांत्रिक शिफारसी आणि जागा नियोजनानुसार करण्यात येईल. उद्योग भागीदारांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि नवोपक्रम केंद्रे विकसित केली जातील. या सामंजस्य करारावर ईशान्य फाउंडेशन तर्फे दीपक फर्टिलायझर्सचे प्रेसिडेंट कॉर्पोरेट गव्हर्नन्स नरेश पिनिसेट्टी आणि संचालक एम. पी. शिंदे यांनी तर नामटेक तर्फे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इब्राहिम हफीजूर रहमान यांनी स्वाक्षरी केली.

# पनवेलमध्ये पाणीटंचाईवर शेकापचा संताप; 17 मे रोजी शांततामय जनआंदोलनाचा इशारा

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचा संताप उफाळून आला असून, सरकारी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात 17 मे रोजी शांततामय जनआंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने देण्यात आला आहे. पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन केले जाणार आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील 29 गावांमध्ये तसेच खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल या सिडको उपनगरांमधील विविध भागांत तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

अक्षरशा सदनिकेची किंमत कोटी रूपये मात्र पिण्यासाठी टँकरचे पाणी अशी अवस्था खारघर व तळोजामधील नागरिकांची झाली आहे. नागरिकांना अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने महिलांपासून ते ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाढती लोकसंख्या, नव्या वसाहती आणि औद्योगिक विस्तार यामुळे पाण्याची मागणी वाढली असताना पुरवठा मात्र अपुरा पडत आहे.शेकापचे नेते व पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी दिलेल्या निवेदनात पनवेल महापालिकेला खेटून असलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेकडे मोठ्या प्रमाणात अतिरिक्त पाणी उपलब्ध असूनही, पनवेलला आवश्यक त्या प्रमाणात पाणी मिळत नसल्याचा आरोप केला आहे. खारघरमध्ये पाणीसंकट तीव्र, दररोज 10 एमएलडी पाणी कमी मिळत असल्याने परिस्थिती बिकट किमान 30 एमएलडी अतिरिक्त पाणी तातडीने पनवेलला देण्यात यावे, अशी मागणी वारंवार करूनही नवी मुंबई महापालिका आयुक्त यावर कोणताही ठोस निर्णय घेत नसल्याने पनवेलच्या नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर शेकाप नेते म्हात्रे यांनी दिलेल्या निवेदनात 17 मे रोजी सकाळी 11 वाजता कामोठे येथील पाणीपुरवठा केंद्राजवळ शांततामय जनआंदोलन आयोजित करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. या आंदोलनात लोकशाही मार्गाने आवाज उठवला जाईल आणि कायदा-सुव्यवस्था राखत प्रशासनाचे लक्ष वेधले जाईल, असे म्हात्रे यांनी सांगितले.

# प्रदूषण टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात

**आपला सत्यवार्ता / प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यात कोळशाच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे निर्माण झालेल्या प्रदूषणविषयक समस्यांवर पर्यावरण, खनिकर्म, परिवहन व स्थानिक प्रशासन यांनी सुचविलेल्या सूचनांची वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने कंपनीनीने अंमलबजावणी करावी असे निर्देश खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. स्थानिक नागरिकांचे आरोग्य लक्षात घेऊन वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड कंपनीने आपल्या कार्यपद्धतीत तातडीने बदल करणे अनिवार्य असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.
सह्याद्री अतिथीगृह येथे चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्याकरिता उपाययोजना करण्याबाबत आयोजित बैठकीत खनिकर्म मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. या बैठकीला आमदार कृपाल तुमाने, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयाचे संचालक डॉ. गजानन कामडे, चंद्रपूरचे निवासी जिल्हाधिकारी दगडू कुंभार हे व्हीसीव्दारे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रधान वैज्ञानिक अधिकारी डॉ विश्वजीत ठाकूर,जिल्हा खनिकर्म अधिकारी चंद्रपूर वसीम सय्यद, जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर आयुष नोपानी यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, चंद्रपूर येथे कोळसा वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था होत आहे. नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम होवून शेतीचे नुकसान होत आहे. तसेच कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ताडपत्री नसणे, कोळशाचे कण उडून प्रदूषण होणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा लोकप्रतिनिधींनी मांडला आहे वरील सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी पर्यावरण, खनिकर्म, परिवहन व स्थानिक प्रशासन यांनी संयुक्त उपाययोजना कराव्यात त्याची अंमलबजावणी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने कंपनीनीने करावी.
मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनांनी ताडपत्रीचे आच्छादन करावे. परिवहन विभागाने भरारी पथकांची संख्या वाढूवन परिसरात वाहतूक नियमांचे पालन होत आहे का ते पहावे. कोळसा उत्खनन करणाऱ्या कंपनीने शासनाने दिलेल्या नियमांचे पालन केले नाही तर संबधित कंपनीवर दंडात्मक कारवाई करण्यात येतील असेही मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.







Printed, Published and Owned by **MRS. RUPALI RAM SHINDE** printed at **ROSHAN PRINTERS,** Shop No. 4, 5, Prakash Niwas, Plot No. 134/01, Near Agri Samaj Hall, Panvel, Raigad - 410 206. and Published from Podi No.2, Shinde Villa, Sector 16, New Panvel, Panvel Dist: Raigad, Maharashtra - 410206.
Editor : **MRS. RUPALI RAM SHINDE** **Email : aaplasatyvarta@gmail.com** **RNI NO : MAHMAR/2023/88879**